जनसंपर्क कक्ष
13 APR 2025
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महात्मा फुलेंचे शैक्षणिक कार्य आत्मसन्मान देणारे

## डॉ. श्यामसुंदर मिरजकर : विद्यापीठात ऑनलाईन व्याख्यान

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १२ : 'महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य, विचार केवळ अक्षर ओळख, अंकगणित इतक्यापुरते मर्यादित नव्हते. त्यांचे कार्य हे बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना बौद्धिक, सामाजिक, नैतिक विकास आणि आत्मसन्मान देणारे होते', असे प्रतिपादन डॉ. श्यामसुंदर मिरजकर यांनी आज केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे सुरू असलेल्या फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाच्या तिसऱ्या दिवशी महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते.

डॉ. मिरजकर म्हणाले, 'बौद्धिक स्तरावर कोणीही श्रेष्ठ अथवा कनिष्ठ नाही. त्यामुळे सर्वांना शिक्षण घेण्याचा अधिकार मिळाला पाहिजे, त्यासाठी हंटर कमिशन पुढे साक्ष देताना ब्रिटिश सरकारने प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करावे. बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळावी, अशी मागणी महात्मा फुले यांनी केली. त्यांनी सर्व वर्गातील स्त्रिया, शूद्र व अतिशूद्र समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी शाळा सुरू केल्या. ते कृतिशील, वैचारिक समाजसुधारक होते.'

दरम्यान, विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत आज सकाळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, शरद बनसोडे, रामचंद्र पवार, तृप्ती करेकट्टी, कैलास सोनवणे, प्रभंजन माने, मच्छिंद्र गोफणे, ए. बी. कोळेकर उपस्थित होते.